महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना (MEMS) अंतर्गत सेवा पुरवठादारास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः ईएमएस-२०१८/प्र.क्र.२७०/ आरोग्य -३

१० वा मजला , गो.ते. संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: ०८ मे, २०१९.

वाचा -

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः ईएमएस-२०११/प्र.क्र. २२४/आरोग्य-३, दिनांक २८ मार्च, २०१३.**

२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः ईएमएस-२०११/प्र.क्र. २२४/आरोग्य-३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१४.**

३) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पीएचडी-३००११/ प्र.क्र. ३८७/ २०१६/ आरोग्य ७, दिनांक १५ जून, २०१६**

४) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः ईएमएस-२०१८/प्र.क्र. ११९/आरोग्य-३, दिनांक ३१ मार्च, २०१९.**

५) **आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान ,मुंबई यांचे पत्र क्रमांक : एसएचएस/ईएमएस/४८८७/२०१९, दि.२२.०४.२०१९.**

प्रस्तावना :-

राज्यात आपदग्रस्तास तातडीने वैद्यकीय मदत मिळावी याकरीता अत्याधुनिक दळणवळण यंत्रणेसह वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज अशा रुग्णवाहिकांची सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून खुली निविदा मागवून सेवा पुरवठादाराची निवड करण्यासाठी शासन निर्णय, दि.२८.१०.२०१० अन्वये अप्पर मुख्य सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली निविदा समिती स्थापन करण्यात आली होती. सदर निविदा समितीने मे.बी.व्ही.जी.इंडीया यांनी सादर केलेली निविदा पात्र ठरवून संपुर्ण राज्यात ९३७ रुग्णवाहिकांची आपत्कालिन प्रतिसाद सेवा (EMS) पुढील ५ वर्षात राबविण्यासाठी मे.बी.व्ही.जी.इंडीया या सेवा पुरवठादारास शासन निर्णय,दिनांक २८ मार्च, २०१३ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले.सदर योजना दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ पासून सुरु झाली असल्याने सेवापुरवठादाराची मुदत दि.३१ जानेवारी, २०१९ रोजी संपली आहे. महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पासंदर्भात सेवापुरवठादारासोबत करण्यात आलेल्या करारास मुदतवाढ देणे वा नविन सेवापुरवठादाराची

नेमणूक करणे याकरीता शासनास शिफारस करण्यासाठी अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने आणि पुढील निर्णय होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने ही रुग्णवाहिका सेवा विनाखंड सुरु ठेवण्यासाठी समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन वरील अ.क्र.४ येथील शासन निर्णयान्वये दि.०१ फेब्रुवारी,२०१९ ते दि.२८ फेब्रुवारी,२०१९ पर्यंत सेवापुरवठादारास जानेवारी,२०१९ च्या दरानुसार एक तातडीची बाब म्हणून मुदतवाढ देण्यास आली होती. सदर मुदत दि. २८ फेब्रुवारी,२०१९ रोजी संपली असून सेवापुरवठादाराबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याने सदर सेवापुरवठादारास मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास उपरोक्त समितीने मान्यता दिली असल्याने यापुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना अंतर्गत कार्यान्वित असलेल्या सुसज्ज रुग्णवाहीकांची सेवा विनाखंड सुरु राहण्यासाठी दि.०१ मार्च,२०१९ पासून ते दि. ३० जून,२०१९ पर्यंत अथवा समितीचा निर्णय झाल्यास तोपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापर्यंत सेवापुरवठादारास सन २०१८-१९ च्या दरानुसार एक तातडीची बाब म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२ सदर कालावधीसाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना अंतर्गत कार्यान्वित असलेल्या सुसज्ज रुग्णवाहीकांवरील आवर्ती खर्चासाठीचे देयक अदा करण्यासाठी यापुर्वी करण्यात आलेल्या करारातील अटी-शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०८११२८३४८६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.05.08 16:07:10 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा),महाराष्ट्र -१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.

२. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई.
५. सहाय्यक संचालक (लेखा व लेखा परिक्षा), आरोग्य सेवा, पुणे.
६. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. नियोजन विभाग (का. १४७२), मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभा ग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
११. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प शाखा) मंत्रालय, मुंबई.
१२. सार्वजनिक आरोग्य विभाग (लेखा शाखा) मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (आरोग्य - ३).